RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ८, अंक २५(२)] शुक्रवार, फेब्रुवारी २५, २०२२/फाल्गुन ६, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ७०

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### वित्त विभाग

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ फेब्रुवारी २०२२.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५.**

क्रमांक व्यकर.१२२२/प्र.क्र.३/कराधान-३.—महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. १६) च्या कलम ६ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकान्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक व्यकर.२०१४/प्र.क्र.३८/कराधान-३, दिनांक २१ ऑगस्ट २०१४ मध्ये खालील सुधारणा करीत आहे.

उक्त अधिसूचनेस जोडलेल्या अनुसूची मधील नोंद क्र.(८) ऐवजी खालील नोंद दाखल करण्यात येत आहे. म्हणजेच-

| (अ) | (ब) | (क) | (ड) | (ई) |
|---|---|---|---|---|
| "८ | कोव्हीड-१९ वैश्विक साथीच्या प्रसारामुळे नियोक्त्याला कराचा भरणा किंवा विवरण अपलोड करता आलेले नाही. | डिसेंबर २०२१ पर्यंतच्या कोणत्याही कालावधीचे विवरण. | स्तंभ (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विवरणावर देय असणारे संपूर्ण विलंब शुल्क. | (अ) स्तंभ (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेले विवरण दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी महाराष्ट्र वस्तू व सेवाकर विभागाच्या संकेतस्थळावर दाखल करावे. (ब) स्तंभ (क) मध्ये संबंधित विवरणानुसार देय कराचा भरणा विवरण दाखल करण्यापूर्वी करावा. (क) स्तंभ (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विवरणानुसार देय करावर कलम ९ च्या पोट-कलम (२) अंतर्गत व्याजाचा भरणा विवरण दाखल करण्यापूर्वी करावा." |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मं. अ. केळकर,**
शासनाचे उप सचिव.



Scanned by CamScanner